राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण
(Eco Tourism Policy)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी 1002/प्र.क्र.53/फ-1

दिनांक : 20 फेब्रुवारी, 2008

प्रस्तावना:-

पूर्वीपासून वन आणि विशेषतः राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पाकडे पर्यटकांचा ओढा आहे. परंतु निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी कोणतेही संघटित आणि पध्दतशीर प्रयत्न झालेले नाहीत.

या क्षेत्रात सर्व स्तरावरुन पर्यटनाकरिता सुखसोयी वाढविण्याची मागणी होत आहे. परंतु निसर्ग पर्यटन म्हणजे पर्यटकांकरिता फक्त सोयी सुविधा वाढविणे असे नसून ही क्षेत्र जैविक विविधतेची आश्रयस्थाने असल्यामुळे अशा क्षेत्राचे आहे त्या स्थितीत संरक्षण करणे असल्याचे आहे. तसेच, ज्या लोकांची उपजिपिका या क्षेत्रावर अवलंबून आहे व ज्यांना या क्षेत्राचे संवर्धन व संगोपन करणे आवश्यक वाटले पाहिजे त्यांचे आर्थिक परिस्थितीत वाढ करणे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. पर्यटकांकरिता लागणाऱ्या दैनंदिन सोयी सुविधा पुरवुन या लोकांना लाभ मिळू शकतो. त्यामुळे राज्यात पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाच्या विकासासाठी तसेच निसर्ग पर्यटनाला चालना देण्यासाठी,

स्थानिक लोकांची संस्कृती जतन करण्यासाठी, तसे पर्यटक व स्थानिक या दोघांनाही लाभप्रद व्हावे, यासाठी एक निसर्ग पर्यटन धोरण ठरविणे आवश्यक असल्याने आता या शासन निर्णयाद्वारे राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण पुढील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

2.0 निसर्ग पर्यटनाची व्याख्या :

"स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीचा आविष्कार, अप्रदुषित व नैसर्गिक क्षेत्रात वन्यपशुपक्षी व झाडेझुडपे यांचा अभ्यास, निसर्गाची ओळख तसेच निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी फिरणे म्हणजे निसर्ग पर्यटन."

3.0 निसर्ग पर्यटनाची तत्वे :

1) "लहान ते सुंदर" लहानातुन भव्य या उक्तीप्रमाणे निसर्ग पर्यटन छोट्या प्रमाणात असावे.
2) पर्यावरणीय दृष्टिकोनातुन, सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या तसेच आर्थिकदृष्ट्या योग्य असावे.
3) अनुभव सिध्द व शिकण्यायोग्य असावे
4) स्थानिक लोकांचा सहभाग असावा.
5) ते ऱ्हास करणारे नसावे
6) पर्यटकांच्या मागणीनुसार परंतु काही निर्बंधासह असावे.

4.0 <u>निसर्ग पर्यटनात हितसंबंधीयांची भूमिता (Role of Stake holder)</u>

4.1 <u>स्थानिक निवासी :</u>

निसर्ग पर्यटनाचे मुळ तत्व स्थानिक रहिवाशांचा सहभाग हे आहे. स्थानिक लोकांना पर्यटनाचा प्रभाव, पर्यटन वाढीमुळे येणारी आर्थिक सुबत्ता याबद्दल जाणीव व्हावी. तसेच त्यांनी पर्यटकांना सेवा देऊन स्वयं रोजगार मिळवावा. त्यांनी स्वतः होवून निसर्ग पर्यटनाच्या व्यवस्थेसाठी समोर व्हावे. याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम तसेच परिस्थितीकीय विकाय कार्यक्रम हे एक चांगले माध्यम होऊ शकेल.

4.2 <u>वन विभाग</u>

वन विभागाने पर्यटकांच्या हितावह व पर्यटकांची निसर्गाशी जवळीक साधण्यासाठी, तसेच पर्यटकांना सोयी निर्माण करण्यासाठी तसेच असे करतांना निसर्ग पर्यटनाचा आघात सुसहय करणे व कायद्याची अंमलबजावणी करणारे असे व्यवस्थापन आराखडे बनविणे अपेक्षित आहे. तसेच हया कार्यक्रमास चालना देत असताना भारतीय वन अधिनियम 1927, वन संवर्धन अधिनियम 1980 व वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 चा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. निसर्ग पर्यटनास येणारा पर्यटक वन व वन्यजीव संरक्षणाचा दूत होवून परत जाईल असे उद्दिष्ट असावे.

4.3 <u>महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ (Maharashtra Eco Tourism Promotion Board)</u>

सदर मंडळाचा मुख्य उद्देश निसर्ग पर्यटनास चालना देणे असल्याने तसेच हे मंडळ वन विभागाशी निगडित असल्यामुळे मंडळाने निसर्ग पर्यटनाच्या वाणिज्यकीय बाबी हाताळाव्यात. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाने वन विभागासोबत संरक्षित क्षेत्रातील भेटी आणि निवास सुविधांचे आयोजन व महसुलाचे विनियोजनाच्या पध्दतीबाबत वन विभागाशी करार (MOU) करावा.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ योग्य त्या परवानग्या घेवून संरक्षित क्षेत्राच्या बाहेरील वन क्षेत्रात स्वतः किंवा बांधा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर निसर्ग पर्यटनाच्या सोयी उपलब्ध करून देईल.

इको टूरीक्षम प्रकल्पाच्या बांधकामाकरिता प्रस्तावित निसर्ग पर्यटन विकास मंडळाने जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने भूसंपादन करण्यासाठी हया मंडळाला राजस्व विभागाचे अधिकार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

4.4 <u>महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ</u> :-

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही पर्यटनाची केन्द्रस्थ यंत्रणा असल्यामुळे काही प्रमुख व प्रसिध्द वन्यजीव क्षेत्राचा त्यांच्या जाहिरातीत सहभाग करीत आहेत. एकदा निसर्ग पर्यटनाचा कार्यक्रम तयार झाला व सर्व सोयी तयार झाल्यावर महामंडळ निसर्ग पर्यटन

स्थळांना त्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवर घेवून निसर्ग पर्यटनास चालना देईल. तसेच यात्रा व्यवस्थापक, हॉटेल मालक तसेच स्थानिक लोकसमुहांचा आघाडीचा सहभाग घेऊन राज्याच्या पर्यटन नकाशावर निसर्ग पर्यटनांची स्थळे येण्याबाबत प्रयत्न करेल. सदरील महामंडळ वन क्षेत्राबाहेर काम करेल. तथापी वन क्षेत्रातील सहली आयोजित करण्यासाठी वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ सोबत योग्य तो समन्वय ठेवले.

4.5 <u>खाजगी सहल व्यवस्थापक :</u>

खाजगी सहल व्यवस्थापकांनी स्थानिक जनता तसेच वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग विकास मंडळाच्या सहकार्याने पर्यटकांना निसर्ग पर्यटनाकरिता येण्यास उद्युक्त करावे. तसेच स्थानिक लोकांच्या सहकार्याने पर्यटकांची राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था, पर्यावरणाचा कोणत्याही प्रकारचा ऱ्हास न होता संरक्षित क्षेत्राचे बाहेर खाजगी किंवा राजस्व विभागाचे जमिनीवर करावी. निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी स्थानिक लोकांनाच जास्तीत जास्त प्रमाणात मिळतील याची त्यांनी दखल घ्यावी. त्याचप्रमाणे त्यांना लागणारी सामुग्री ही जास्तीत जास्त स्थानीकरित्या मिळविण्याचा प्रयत्न करावा जेणे करून पर्यटनाच्या अनुषंगिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

4.6 <u>राज्य शासन</u>

राज्य शासन, ज्या ठिकाणी विकास कामे घेता येत नाहीत अशा दुर्गम भागात निसर्ग पर्यटनाच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त आर्थिक योगदान देण्याचे प्रयत्न करेल. राज्य शासनाने डिसेंबर 2006 मध्ये घोषीत केलेल्या पर्यटन धोरणा 2006 मधील परिच्छेद 4 मध्ये अनुक्रमांक (13) वर निसर्ग पर्यटन प्रकल्पाचा समावेश केला आहे. त्यामुळे त्या धोरणा अंतर्गत प्रस्तावित वित्तीय व इतर सुविधा आपोआपच निसर्ग पर्यटन प्रकल्पांना लागू होतील. फक्त निसर्ग पर्यटन प्रकल्प छोट्या प्रमाणावर ठेवायचे असल्याने तसेच अशा प्रकल्पात मोठी गुंतवणुक येण्याकरिता अजून काही कालावधी लागणार असल्याने सदर धोरणाच्या अनुसुची "अ" मधील अनुक्रमांक (15) मधील इतर प्रकरण हया सदरात "निसर्ग पर्यटन प्रकल्पाचा" समावेश राहील. हया नुसार वित्तीय व इतर सुविधा/ सवलतीकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती हयाबाबत निर्णय घेईल.

5.0 <u>निसर्ग पर्यटनाकरिता अवलंबवयाची कार्यपध्दती :</u>

5.1 <u>स्थहांची निवड</u>

सुरुवातीला सदर कार्यक्रम राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये, वनउद्याने, चांगली घनता असलेले वनक्षेत्र, मोठी पाणस्थळे व थंड हवेची ठिकाणे अशा प्रसिध्द पर्यटनस्थळी घेण्यात येईल. तद्नंतर सदर कार्यक्रम इतर क्षेत्रात, उदा. जुने यशस्वी लागवड क्षेत्र, आधुनिक रोपवाटिका, प्रिझरवेशन प्लॉट येथे

पर्यटकांच्या आवडी लक्षात घेवून ठरविण्यात येईल. अशाप्रकारच्या सर्व ठिकाणांची यादी तयार करण्यात येईल. निसर्ग पर्यटन क्षेत्राचे जाळे विकसीत करून विविध चांगली पॅकेजेस तयार केली जातील. वनाचे सौंदर्य, वन्यजीव बघण्याचा आनंद तसेच धार्मीक ठिकाणे व आदिवासी क्षेत्रातील सांस्कृतिक विविधता बघण्याचा आनंद पर्यटकांना घेता येईल अशी ठिकाणे निवडण्यात येतील.

5.2 पर्यटक अभिमुखता

समुह पर्यटनाला चालना देण्यात येईल.

विद्यार्थ्यांना आत्मसात करण्याची चांगली क्षमता असल्यामुळे त्यांना निसर्ग सांस्कृतिक वारसा वन व वन्यजीव बाबत आवड असते.

व्यावसायीक संस्थेचे कर्मचारी व कौटुंबिक समुह

निसर्ग, पक्षी व वन्यजीव निरीक्षण करण्यास इच्छुक असलेले पर्यटक

साहसी पर्यटक

विदेशी पर्यटक

एका दिवसाकरिता येणारे पर्यटक

उपरोक्त विभिन्न पर्यटक समुहाची आवश्यकता पूर्ण होण्याच्या दृष्टीने विविध सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. हयामध्ये समाजातील सर्व स्तराच्या लोकांना सहभाग घेता येईल याची दखल घेण्यात येईल.

## 5.3 निवास व्यवस्था

संरक्षित क्षेत्रात (अभयारण्यात/राष्ट्रीय उद्यानात) नवीन बांधकाम केले जाणार नाही. फक्त जुन्या इमारतीचे नुतनीकरण/दुरूस्ती करण्यात येईल. जंगलातील वास्तव्य व निसर्ग पाहण्याकरिता वन विश्रामगृहे व निरीक्षण कुटी विविध ठिकाणी आहेत. अभयारण्य/राष्ट्रीय उद्यानाबाहेरील वन विश्रामगृहे व निरीक्षण कुटींची कायपालट करता येईल. जेणे करून निसर्ग पर्यटनास चालना मिळेल.

पर्यटक समुहांना विवक्षित ठिकाणी तंबू किंवा राहुटी मध्ये राहता येईल.

स्थानिक गावकरी पाश्चात्य पध्दतीचे शौचालय व स्नानघर तयार करून त्यांचे घरी पर्यटकांना योग्य मोबदला घेवून अतिरिक्त निवासस्थान उपलब्ध करून देऊ शकतील त्याचप्रमाणे पर्यटकांकरिता निसर्ग मार्गदर्शन म्हणुन काम करू शकतील. हयामुळे पर्यटकांना परंपरागत पध्दतीच्या निवासस्थानात राहण्याचा आनंद मिळू शकेल तसेच यामुळे स्थानिक लोकांना त्वरीत आर्थिक लाभ मिळेल. या पध्दतीचे निवासस्थान तयार करण्याचे तसेच पर्यटकांचे आदरातिथ्य करण्याचे प्रशिक्षण स्थानिक लोकांना देण्यात येईल. हया करिता आदिवासी विकास विभागाच्या सहाय्याने आदरातिथ्य व्यवस्थानाचे

प्रशिक्षण (Hospitality Management Training) स्थानिक युवकांना देण्याकरिता आर्थिक तरतुद करण्यात येईल.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ वनक्षेत्रामध्ये व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ वनक्षेत्राबाहेर बुश कॅम्पच्या धरतीवर रहाण्याची ठिकाणी विकसित करतील.

निसर्ग पर्यटनाच्या सर्व कार्यक्रमात विद्यार्थी समुहाला विशेष सवलत देण्याची दखल घेण्यात येईल.

वरील सर्व ठिकाणी मुलभुत सोयी जसे, खानपान व्यवस्था तसेच शौचालय व स्नानघरे राहतील.

वन विभागाची विश्रामगृहे राज्यात बऱ्याच ठिकाणी आहेत. काही वनक्षेत्रात उदा. मेळघाटात अशा वन विश्रामगृहांची संख्या जास्त आहे. अशा ठिकाणी असलेल्या वन विश्रामगृहापैकी काही निवडक वन विश्रामगृह पर्यटकांना निवासाकरिता उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ही वन विश्रामगृहे स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती अथवा स्थानिक बचत गटाला व्यवस्थापनाकरिता हस्तांतरीत करण्यात येतील.

5.4 <u>माहिती व प्रसार</u> :

पर्यटन शिक्षण हा निसर्ग पर्यटनाचा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे पर्यटकांना माहिती व निसर्ग निर्वचनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. हयामध्ये त्यांना निसर्गाबाबतची माहिती, पर्यटकांकरिता आचारसंहीता यांचा समावेश असेल. यासाठी भिंत्तीपत्रके, पत्रके तसेच प्रशिक्षित मार्गदर्शक आणि माहिती केंद्र किंवा निर्वचन केंद्राचा उपयोग करण्यात येतील.

स्थानिकरित्या उपलब्ध साधनापासून जसे बांबू पासून कमी किंमतीची अभ्यागत कक्ष तयार करण्यात येईल.

5.5: विस्तार/प्रसिध्दी

जरी निसर्ग पर्यटनाचा जास्तीत जास्त प्रसार मुखोमुखी होण्याची आवश्यकता असली तरी प्रारंभिक स्थितीत निसर्ग पर्यटनाच्या यशस्वीतेसाठी प्रसिध्दी देणे आवश्यक आहे.

एक आकर्षक वेब साईट विकसीत करण्यात येईल आणि तो सध्या अस्तित्वात असलेल्या पर्यटनासंबंधीत वेबसाईटशी जोडण्यात (लिंक) येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वेबसाईटस वर सुध्दा लिंक देण्यात येईल. कालांतराने स्थळांचे Online Booking तसेच Virtual Tour ची सोय हया Website वर देण्यात येईल.

जाहिराती, पत्रके, माहितीपत्रके याद्वारे विविध निसर्ग पर्यटनाच्या कार्यक्रमाची जाहीरात करण्यात येईल व त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व इतर प्रतिष्ठीत पर्यटन संस्थाशी संपर्क साधून इच्छुक पर्यटक समुहांना या योजनेची माहिती देण्यात येईल. या संस्थाना निसर्ग पर्यटनाचे पॅकेज देण्यात येईल.

5.6: क्षमता बांधणी (Capacity Building)

निसर्ग पर्यटन हा कार्यक्रम नवीन असल्याने व्यवस्थापकांची व समुदायांचे स्थितीज्ञान व क्षमता बांधणीची आवश्यकता आहे.

5.6.1: व्यवस्थापक :

निसर्ग पर्यटन व्यवस्थापकांमध्ये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, वनविभाग व इतर पर्यटनासंबंधी विभागांचे अधिकारी यांचा समावेश असेल. व्यवस्थापकांनी स्थानिक समूह संस्थांच्या बळकटीकरणासाठी समन्वयकाची व मार्गदर्शकाची भुमिका घ्यावी, त्यांनी निसर्ग पर्यटनाचे विकासाकरिता नवीन पध्दतीचा अवलंब करावा. अल्पकालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम चर्चासत्र, कार्यशाळा, बैठका तसेच यशस्वी पर्यटन क्षेत्रास भेटी देऊन आवश्यक माहिती व प्राविण्य प्राप्त करावे.

5.6.2: स्थानिक रहिवासी

सुरुवातीला स्थानिक लोकं पर्यटकांना मार्गदर्शक, सामानवाहक, माळ्याची कामे करणे व त्यांचे निवासस्थानी पर्यटकांची राहण्याची सोय इत्यादी सेवा उपलब्ध करून देतील हयाकरिता स्थानिक रहिवाशांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. स्थानिक हस्तकलेची दुकाने आणि वनऔषधीची दुकाने उघडतील. तद्‌नंतर ते स्वतःहून निसर्ग पर्यटनाची व्यवस्था करण्यायोग्य होतील अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकांना कौशल्याप्राप्तीकरिता कमी अवधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच त्यांना यशस्वी निसर्ग पर्यटन केंद्रास भेटीचे आयोजन करण्यात येईल. त्यामुळे स्थानिक लोक निसर्ग पर्यटन या नवीन कार्यक्रमास यशस्वीपणे तोंड देतील Hospitality Management चे प्रशिक्षण स्थानिक युवकांना देण्याकरिता आदिवासी विकास विभागाकडून आर्थिक तरतुद करण्यात येईल.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ (Maharashtra Eco Tourism Promotion Board) बाबतची घटना, संरचना, नियम, अधिकार इत्यादीसाठी अलाहिदा आदेश काढण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(नितीन काकोडकर)
सह सचिव (वने)

प्रति,
मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय मुंबई
महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मंत्रालय मुंबई
प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा नागपुर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ नागपूर
संचालक समाजिक वनीकरण संचालनालय, म.रा. पुणे
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य वनसरक्षक (प्रादेशिक) सर्व
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपुर/मुंबई (बोरीवली)/नाशिक
वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे/कोल्हापूर/नाशिक
वनसंरक्षक कोल्हापूर उत्तर चंद्रपूर दक्षिण चंद्रपूर
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती
वनसंरक्षक तथा संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर